REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.2331(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 7 | ISSUE - 10 | JULY - 2018

# शालेय विद्यार्थ्यांच्या भावनिक बुद्धिमत्तेचा अभ्यास

**श्रीमती.सुभेदार.पी.पी.**
**सहयोगी प्राध्यापक, शासकीय अध्यापक महाविद्यालय मुंबई.**

## सारांश :-

**सध्याच्या शिक्षणप्रक्रियेमध्ये बौद्धिक विकासाकडे अधिक लक्ष दिले जाते . त्यामानाने भावनिक विकास दुर्लक्षित राहिलेला आहे.** सध्याचे स्पर्धात्मक जग, वेगवान जीवन यामुळे येणारे ताणतणाव, विभक्त कुटूंब, व्यक्तीवर वाढणारा शारीरिक व मानसिक ताण, आत्महत्येचे वाढते प्रमाण, रॅगिंगचे वाढते प्रमाण, रक्तदाब, हदयविकार या सर्वांवर नियत्रंण करण्यासाठीच्या प्रयत्नांचा एक धागा म्हणजे भावनिक बुद्धिमत्ता.**म्हणून संशोधकाने इ . ८ वी च्या विद्यार्थ्यांच्या भावनिक बुद्धिमत्तेचा अभ्यास करण्याचे ठरवले**



## प्रस्तावना :-

**शिक्षण प्रक्रीया ही विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाची प्रक्रिया आहे . विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासामध्ये शारीरिक , भावनिक , बौद्धिक , सामाजिक विकास अपेक्षित आहे . परंतु सध्याच्या शिक्षणप्रक्रियेमध्ये बौद्धिक विकासाकडे अधिक लक्ष दिले जाते . त्यामानाने भावनिक विकास दुर्लक्षित राहिलेला आहे . तसेच म.गांधीजींनी सांगितल्याप्रमाणे सर्वांगीण विकास म्हणजे 3 H - Head , Heart & Hand चा विकास. सध्या मात्र Head & Heart चा विकास होताना दिसतो . परंतु Heart च्या विकासाकडे लक्ष दिले जात नाही . त्यामुळे विद्यार्थ्यांचा भावनिक विकास कमी होताना दिसतो .**

**शालेय विद्यार्थी यामधील इ . ८ वी च्या विद्यार्थी संशोधकाने विचारात घेतले आहेत . किशोर अवस्थेमधून कुमार अवस्थे मध्ये प्रवेश करणारा हा वयोगट . बुद्धिमान नेहमीच जीवनात यशस्वी होतात असे आपण समजतो . मात्र अलीकडे मानसशास्त्रज्ञांच्या असे लक्षात आले की जीवनात यशस्वी होण्यासाठी बुद्धीमत्तेशिवाय काही व्यक्ती विशेषता असणे आवश्यक आहे . ह्या व्यक्ती विशेषता म्हणजेच व्यक्तीमधील क्षमतांचा विचार प्रसिद्ध मानसशास्त्रज्ञ मॅकलेलँड यांनी १९७३ मध्ये आपल्या शोधनिबंधात मांडला .त्यातूनच बुधीमात्तेशिवाय अन्य क्षमता म्हणजेच भावनिक बुद्धिमत्तेचा अभ्यास संशोधकाने करायचे ठरवले .**

## संशोधनाची गरज :-

**डॅनिअल गोलमन यांची व्याख्या** "आपल्यातील व इतरांमधील भावनिक संबंध नीट जुळावेत यासाठी, स्वत प्रसिदध व्हावे म्हणून स्वतःच्या व इतरांच्या ओळखण्याकरीता जी पात्रता लागते, ती म्हणजे 'भावनिक बुद्धिमत्ता' बुद्ध्यंकाने मोजली जाणारी आकलन क्षमता किंवा शैक्षणिक गुणवत्ता यांच्यापेक्षा भिन्न पण पूरक असे भावनिक बुद्धिमत्तेचे वर्णन केले जाते." लॅटिन भाषेत भावनांचे वर्णन मोटस

अनिमा असे करतात. याचा अर्थ भावनांची ही शक्ती, खोली योग्य प्रकारे वापरुन स्वतःतील एकमेवाद्वितीय सूप्त क्षमता आणि आंतरिक जीवनमूल्ये यांना चालना देणे व जीवन अधिक सुखकर करणे यासाठी भावनिक बुद्धिमत्तेचा उपयोग होतो. जीवनात व व्यवसायात यशस्वी होण्यासाठी भावनिक बुद्धिमत्तेचे विविध घटक उपयुक्त ठरतात. गोलमनच्या मते 'तर यशस्वितेत शैक्षणिक बुद्धिमत्तेचा वाटा २० टक्के तर भावनिक बुद्धिमत्तेचा वाटा ८०टक्के असतो.एन्.सी.इ. आर. टी. च्या राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडयामध्ये (२०००) मुलांमध्ये स्वनियंत्रण,सेवाभावी वृत्ती, जबाबदारीची जाणीव यांचा विकास मुलांमध्ये होण्याची आवश्यकता सांगितलेली आहे. भावनिक बुद्धिमत्ता व भावनिक साक्षरता यांच्या प्रशिक्षणामुळे राग, आक्रमकता, व्यसनधीनता, संघर्ष यांचे योग्य व्यवस्थापन करता येईल. मुलांची संप्रेक्षण कौशल्ये, प्रेरणा, आंतरक्रिया हयात सुधारण होऊन शैक्षणिक घसरण थांबेल व शाळेचे सक्षमीकरण होईल.

सध्याचे स्पर्धात्मक जग, वेगवान जीवन यामुळे येणारे ताणतणाव, विभक्त कुटूंब, व्यक्तीवर वाढणारा शारीरिक व मानसिक ताण, आत्महत्येचे वाढते प्रमाण, रॅगिंगचे वाढते प्रमाण, रक्तदाब, हृदयविकार या सर्वांवर नियत्रंण करण्यासाठीच्या प्रयत्नांचा एक धागा म्हणजे भावनिक बुद्धिमत्ता. डॅनियल गोलमन यांच्या व्याख्येनुसार भावनिक बुद्धिमत्तेमध्ये एकुण पाच क्षमतांचा समावेश होतो. त्या पुढीलप्रमाणे

**वैयक्तिक क्षमता :-** आत्मपरीचय , स्व-नियंत्रण , अभिप्रेरण

**समाजिक क्षमता :-** तद्नुभूती , सामाजिक कौशल्ये

**म्हणून संशोधकाने इ . ८ वी च्या विद्यार्थ्यांच्या भावनिक बुद्धिमत्तेचा अभ्यास करण्याचे ठरवले . हा वयोगट कुमार अवस्थेत प्रवेश करणारा वयोगट होय. हा अभ्यास अनुदानित व विनानुदानित शाळेतील विद्यार्थ्यांच्या संदर्भात केलेला आहे .**

## संबंधित संशोधन साहित्याचा आढावा:– भावनिक बुद्धिमत्ता

गौतम (२०००) हयांना भावनिक बुद्धिमत्ता, स्वसंकल्पना आणि शैक्षणिक संपादन हयात धन सहसंबंध आढळून आला. त्यागी (२००४) हयांच्या संशोधनानुसार भावनिक बुद्धिगुणांक लिंग व वय हयावर अवलंबून नसतो. अमृता आणि काडहिरावन (२०००) यांच्या संशोधनानुसार जे शिक्षक खाजगी शाळांमध्ये काम करत होते. त्यांच्यात स्वजाणीव विविध कौशल्ये इ. भावनिक बुद्धिमत्तेसंबंधित घटक त्यांच्यात आढळून आले. इंदु. एच्. (२००६) हयांच्या संशोधनानुसार सरकारी, अनुदानित व विनाअनुदानित महाविद्यलयातील विद्यार्थ्यांच्या भावनिक बुद्धिगुणांकामध्ये फरक आढळलेला नाही. हरिणी,(२०१०) हयांच्या संशोधनानुसार भावनिक बुद्धिमत्तेचा परीणाम जीवनातील असमाधान व कामातील प्रगती यावर होतो. फर्थ आणि क्रिस्टल,आय.सी.(२०१२) हयांच्या संशोधनानुसार भावनिक बुद्धिमत्तेचा परीणाम व्यक्तिमत्वावर, बौद्धिक क्षमतेवर आणि कामाच्या ठिकाणची गुंतागुंत यावर होतो. लिब्बरेचॅट, एन्. आणि बेरन्ड, के. (२०१४) हयांच्या संशोधन निष्कर्षानुसार वैद्यकीय महाविद्यालयातील अभ्यासक्रमात भावनिक बुद्धीमत्तेचा समावेश केला तर विद्यार्थ्यांमधील प्रभावी संप्रेषण व आंतरवैयक्तिक संवेदनशीलतेचे निदान करता येते.

## संशोधनाची उद्दिष्टे:-

**१)इ. आठवीच्या विद्यार्थ्यांच्या भावनिक बुद्धिमत्तेचा अभ्यास करणे**

**२) इ. आठवीच्या विद्यार्थ्यांच्या भावनिक बुद्धिमत्तेची तुलना अनुदानित व विनानुदानित शाळां नुसार करणे**

**संशोधनाची शून्य परिकल्पना:- इयत्ता ८ वी च्या विद्यार्थ्यांच्या भावनिक बुद्धीमत्ते मध्ये अनुदानित व विनानुदानित शाळानुसार लक्षणीय फरक नाही**

**<u>गृहीतके</u> :-प्रत्येक व्यक्ती मध्ये भावनिक बुद्धीमत्तेच्या क्षमता कमी अधिक प्रमाणात अस्तित्वात असतात.**

संशोधनाची व्याप्ती व मर्यादा:

हया संशोधनाची व्याप्ती नवी मुंबई परीसरातील शाळांपुरती मर्यादित आहे. हे संशोधन मराठी माध्यमातील शहरी व ग्रामीण शाळांपुरते मर्यादित आहे. तसेच एस्.एस्.सी बोर्डाच्या अंतर्गत येणाऱ्या शाळांचा समावेश त्यामध्ये आहे.केवळ इ. ८ वी च्या विद्यार्थ्यांच्या **भावनिक बुद्धिमत्ता**, या घटकांचा अभ्यास केलेला आहे.

**संशोधनाची पद्धत::-**हे वर्णनात्मक संशोधन असून त्यामध्ये सर्वेक्षण व सहसंबंध पद्धतीचा वापर केलेला आहे. इ. ८ वी च्या विद्यार्थ्यांच्या संदर्भात **हा अभ्यास** केलेला आहे. माहिती संकलनसाठी सर्वेक्षणाचा वापर केला गेला. हे संशोधन नवी मुंबईमधील १२ शाळांमधील इ. ८ वी च्या १०१६ विद्यार्थ्यांवर केलेले आहे.

**संशोधनाची साधने:** भावनिक बुद्धिमत्ता चाचणी (संशोधक निर्मित) **याचा वापर केला** .भावनिक **बुद्धिमत्ता चाचणी मध्ये भावनिक बुद्धीमत्तेच्या पाच घटकांसंबंधित ७५ विधानांचा समावेश केलेला होता..**

**संशोधना नमुना:** इयत्ता ८ वी च्या विद्यार्थ्यांची निवड संशोधनासाठी केलेली आहे. हया विद्यार्थ्यांची संख्या १०१६आहे. हे विद्यार्थी नवी मुंबई परीसरामध्ये असलेल्या अनुदानित, विनाअनुदानित शाळांमधील शहरी आणि ग्रामीण भागातील आहेत. बारा शाळांची निवड संभाव्यता नमुना निवडीने केलेली आहे.

**संकलित माहितीचे विश्लेषण व अर्थानिर्वचन:- विद्यार्थ्यांनी भावनिक बुद्धिमत्ता चाचणीला दिलेल्या प्रतिसादांचे विश्लेषण करून निष्कर्ष काढण्यात आले.प्राप्त माहितीचे विश्लेषण करण्यासाठी शेकडेवारी,मध्यमान,प्रमाण विचलन यांचा वापर करण्यात आला.अनुदानित व विनाअनुदानित शाळांमधील विद्यार्थ्यांच्या भावनिक बुद्धीमत्तेची तुलना करण्यासाठी 'टी'परिक्षीकेचा वापर केला.**

**कोष्टक क्र १** भावनिक बुद्धिमत्तेसंदर्भात विविध गटांचे मध्यमान व प्रमाण विचलन.

| चल | गट | विद्यार्थी संख्या | मध्यमान | प्रमाण विचलन |
|---|---|---|---|---|
| भावनिक बुद्धिमत्ता | **अनुदानित शाळा** | **८८८** | **५०** | **९.४८** |
| | **विनानुदानित शाळा** | **१२८** | **४८** | **१२.३४** |

**निरीक्षण व अर्थानिर्वचन:-भावनिक बुद्धिमत्तेच्या संदर्भात अनुदानित आणि विना अनुदानित गटांची तुलना करता अनुदानित गटाचे मध्यमान विनानुदानित गटापेक्षा अधिक आहे .**

**कोष्टक क्र. २ इयत्ता ८वी च्या विद्यार्थ्यांची भावनिक बुद्धिमत्तेची वारंवारिता दर्शविणारे कोष्टक.**

| विभाग | मर्यादा | वारंवारिता | | ोकडेवारी | |
|---|---|---|---|---|---|
| | | **अनुदानित शाळा** | **विनानुदानित शाळा** | **अनुदानित शाळा** | **विनानुदानित शाळा** |
| खूप उच्च भावनिक बुद्धिमत्ता | **३७५-३०१** | **३३८** | **४३** | **३३** | **४** |
| उच्च भावनिक बुद्धिमत्ता | **३००-२२५** | **५३३** | **७९** | **५२** | **८** |
| सामान्य भावनिक बुद्धिमत्ता | **२२४-१५०** | **१७** | **६** | **२** | **१** |
| | एकुण | **१०१६** | | **१००** | |

निरीक्षण :— वर दिलेल्या तक्यामध्ये इ. ८ वी च्या विद्यार्थ्यांच्या भावनिक बुद्धिमत्तेच्या मर्यादा दर्शविलेल्या आहेत **३७५ ते ३०१** हया दोन मर्यादामध्ये खूप उच्च भावनिक बुद्धिमत्ता आढळली. तर **३०० ते २२५** हया दोन मर्यादांमधील उच्च भावनिक बुद्धिमत्ता आढळली. तर सामान्य भावनिक बुद्धिमत्ता **२२४ ते १५०** हया दरम्यान आढळून आली.

अर्थनिर्वचन :- **अनुदानित शाळा व विनानुदानित शाळेतील खूप उच्च भावनिक बुद्धिमत्ता असणाऱ्या भावनिक बुद्धिमत्ता** विद्यार्थ्यांची **संख्या कमी आहे . तसेच सामान्य भावनिक बुद्धिमत्ता असणाऱ्या** विद्यार्थ्यांची **संख्या कमी आहे. दोन्ही शाळांमधील उच्च भावनिक बुद्धिमत्ता असणाऱ्या** विद्यार्थ्यांची **संख्या जास्त आहे .**

संशोधनाचे उद्दिदष्टः– इयत्ता ८ वी च्या विद्यार्थ्यांच्या भावनिक बुद्धिमत्तेची तुलना **अनुदानित व विनानुदानित शाळे** नुसार करणे.

शून्य परीकल्पना : –इयत्ता ८ वी च्या विद्यार्थ्यांच्या भावनिक बुद्धिमत्तेमध्ये **अनुदानित व विनानुदानित शाळे** नुसार लक्षणीय फरक नाही. सदर परिकल्पना पडताळणीसाठी 'टी' परीक्षिका तंत्राचा उपयोग करण्यात आला. कोष्टक क्र **२** मध्ये इ. **८** वी **अनुदानित व विनानुदानित शाळा** यांचे भावनिक बुद्धिमत्ता कसोटीमधील प्राप्तांकाचे संख्याशास्त्रीय विवेचन करण्यात आलेले आहे.

**कोष्टक क्र. ३ अनुदानित व विनानुदानित शाळेतील इ. ८ वी च्या विद्यार्थ्यांच्या भावनिक बुद्धिमत्ता कसोटीतील प्राप्तांकांच्या मध्यमानातील फरकाची लक्षणीयता.**

| गट | मध्यमान | विद्यार्थी संख्या | स्वाधीनता मात्रा | प्राप्त 'टी' मूल्य | नमुना 'टी' मूल्य | सार्थकता स्तर | सार्थकता |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **अनुदानित शाळा** | **५०** | **८८८** | **१०१६** | **३.६४** | **१.६४५** | **०.०५** | आहे |
| **विनानुदानित शाळा** | **४८** | **१२८** | | | **२.३२६** | **०.०१** | आहे |

निरीक्षण :– संख्याशास्त्रीय को टकावरुन **०.०५** व **०.०१** सार्थकता स्तरावर स्वाधीनता मात्रा df=**१०१४** करीता t मूल्य अनूक्रमे **१.६४५** आणि **२.३२६** आहे. प्राप्त t मूल्य **३.६४** दोन्ही स्तरावरील नमुना t मूल्यापेक्षा जास्त असल्याने प्राप्त t सार्थक आहे. म्हणून ून्य परिकल्पनेचा त्याग करावा लागेल. भावनिक बुद्धिमत्तेच्या बाबतीत **अनुदानित शाळा व अनुदानित विनानुदानितशाळा** नुसार लक्षणीय फरक **अ**सल्याचे मान्य करावे लागेल.

अर्थनिर्वचन – **प्राप्त t सार्थक असल्याने भावनिक बुद्धिमत्तेच्या संदर्भात अनुदानित व विनानुदानित शाळांमध्ये भेद आहे असे म्हणता येईल**

**अशा प्रकारे संशोधकाने इयत्ता ८ वीच्या विद्यार्थ्यांच्या भावनिक बुद्धिमत्तेचा शोध घेण्याचा प्रयत्न केलेला आहे .**

## संदर्भ :-

1.Best,J.W. and Khan,J.W(2003).Research in Education ,(9th edition ),New Delhi,Prentic-Hall of India.
२. कुलकर्णी, डी. आर. .(२००६). प्रगत शैक्षणिक मानसशास्त्र. विद्याप्रकाशन, नागपूर
३. दलिपसिंह .(२०१०). भावनिक बुद्मित्ता. डायमंड प्रकाशन, पुणे.
४. देशपांडे, सी. (२००२). भावनिक बुद्धिमत्ता *शिक्षण समिक्षा.*